महाराष्ट्र शासन
जिल्हा परिषद अमरावती
मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय
दूरध्वनी क्र. ०७२१-२६६२९२६ Email :-ceozp.amravati@maharashtra.gov.in

क्रमांक - जिप/मुकाअ /स्विस/ 2025 दि. 25 फेब्रुवारी 2025

आवास योजना (ग्रामीण)/मनरेगा कामांची गुणवत्ता, पारदर्शकता ठेवण्यासाठी योग्य ती खबरदारी घेणेबाबत....

**परिपत्रक**

अमरावती जिल्हयात मोठया प्रमाणात प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) आणि राज्यपुरस्कृत आवास योजनेतील घरकुले मंजुर झालेली आहेत. सर्व मंजुर लाभार्थींना मंजुर पत्राचे वाटप करण्यात आलेले असून घरकुल बांधकामासाठी लाभार्थींना पहिल्या हप्ताचे वितरण झालेले आहे. लाभार्थीकडून विहीत कालावधीत घरकुलें बांधून पूर्ण करण्याची जबाबदारी तालुकास्तरीय यंत्रणेवर आहे. मा. मंत्री ग्रामविकास, म.रा. यांच्या 6 फेब्रुवारी 2025 रोजीच्या अमरावती विभागीय बैठकीत आवास योजना, मनरेगा इ. कामांची गुणवत्ता उच्च दर्जाची ठेवण्याची जबाबदारी सर्व संबंधित अधिकारी यांचेवर राहील असे निर्देशित केले आहे. तसेच प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, अमरावती कार्यालयाचे पत्र क्रमांक - जिग्राविय/बांधकाम/कक्ष / 191/अ/2025 दिनांक 08.02.2025 अन्वये सर्व गट विकास अधिकारी यांना कळविण्यात आलेले आहे.

तथापि, घरकुलें,मनरेगाच्या किंवा अन्य कामे करताना ग्रामपंचायत किंवा तालुकास्तरावर लाभार्थींची अडवणूक झाल्यास किंवा लाचेची मागणी झाल्यास संबंधित गट विकास अधिकारी यांचेकडे किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मोबाईलवर (मो.नं. 7978504317)तक्रार करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. गट विकास अधिकारी यांनी सदर परिपत्रकाची व्यापक प्रसिध्दी दयावी. परिपत्रक ठळकपणे दर्शनी भागात लावावे.

Signed by
Sanjita Mohapatra
Date: 27-02-2025 11:18:29
(संजीता महापात्र, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अमरावती

प्रति,
गट विकास अधिकारी, ............... सर्व, प.सं;
जिल्हा परिषद अमरावती.

प्रतिलिपी –
जिल्हा माहिती अधिकारी, खापर्डे बगिचा जवळ अमरावती यांना कळविण्यात येते की, उपरोक्त परिपत्रक जिल्हा वृतपत्रात प्रसिध्दीस देण्यात यावे.

Shot on OnePlus
Madhu
Scanned with OKEN Scanner